Reg. No. /NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**प्राधिकृत प्रकाशन**

वर्ष ९, अंक ११] गुरुवार ते बुधवार, मार्च १६-२२, २०२३/फाल्गुन २५, शके १९४४-चैत्र १, शके १९४५ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक—अमरावती विभागीय पुरवणी

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक–अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-६ |
| **भाग एक-अ.—**(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | १-२६ |


## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३२८.

**जिल्हादंडाधिकारी, यांजकडून**

**संदर्भ :-** पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक : जिविशा-का.व.सु.-कलम ३७ (१)(३)-प्रतिबंधक-४६९५-२०२२, वाशिम दिनांक १९ डिसेंबर २०२२.

**मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(१) (३) लागू करणे बाबत**

**आदेश**

क्रमांक कक्ष-८-अ.का.(गृह)-कावि-१०९-२०२२.—

ज्याअर्थी, वाशिम जिल्ह्यात दिनांक २५ डिसेंबर २०२२ रोजी ख्रिश्चन बांधवातर्फे नाताळ सण साजरा करण्यात येतो दिनांक ३१ डिसेंबर २०२२ व दिनांक ०१ जानेवारी २०२३ रोजी नववर्षाचे स्वागत करण्याकरीता विविध प्रकारचे मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. दिनांक ०३ जानेवारी २०२३ रोजी सावित्रीबाई फुले जयंती निमित्त विविध सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.

सद्यःस्थितीत विविध पक्ष/संघटना/सामाजिक कार्यकर्ते यांचेकडून वेगवेगळ्या मागण्याकरीता/धरणे/आंदोलने/उपोषणे करण्यात येत आहेत.

वाशिम जिल्ह्यात सण-उत्सवाचे दृष्टिने राजकीय दृष्टिने संवेदनशील असून नमूद काळात जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखणे सूलभ व्हावे यासाठी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये दिनांक २३ डिसेंबर २०२२ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक ०१ जानेवारी २०२३ रोजीचे २४.०० वा. पर्यंत संपूर्ण वाशिम जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश लागू होणे अत्यंत आवश्यक असल्याचे पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

त्याअर्थी, मी, वसुमना पंत, (भा. प्र. से.) जिल्हादंडाधिकारी, वाशिम, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये मला प्राप्त अधिकाराचा वापर करून, दिनांक २३ डिसेंबर २०२२ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक ०६ जानेवारी २०२३ रोजीचे २४.०० वा. पर्यंत मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये संपूर्ण वाशिम जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश पारीत करीत आहे. सदर आदेश लागू केल्यामुळे वाशिम जिल्ह्यामध्ये खालील गोष्टीकरीता मनाई करण्यात आलेली आहे.

(१) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, लाठ्या किंवा काठ्या तसेच शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येतील अशा इतर कोणत्याही तिक्ष्ण वस्तु जवळ बाळगणे.

(२) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ वाहून नेण्यास.

(३) दगड किंवा क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा तशी साधने जवळ बाळगणे, जमा करणे, किंवा तयार करणे.

(४) व्यक्तींचे प्रेते किंवा मनुष्याकृतीच्या प्रतिमा/आकृत्या यांचे बिभत्स प्रदर्शन करणे.

(५) वाद्य वाजविणे, किंकाळ्या फोडणे किंवा जाहीरपणे प्रक्षोभक घोषणा करणे अशा प्राधिकारांच्या मते ज्यामुळे नागरी सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्या कृतीमध्ये राज्य प्रशासन उलथून पाडण्याची प्रवृत्ती दिसून येईल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, सोंग आणने, पत्ते खेळणे आणि तशी चिन्हे, चित्रे, फलके किंवा कोणत्याही जिन्नस/वस्तु तयार करणे किंवा त्याचा लोकामध्ये प्रसार/प्रचार करणे.

तसेच, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींच्या जमावास एकत्र जमण्यास किंवा मिरवणुकीस मनाई करीत आहे.

प्रस्तुत आदेश कामावरील कोणतेही पोलीस अधिकारी किंवा इतर शासकीय / निमशासकीय कर्मचारी किंवा विवाह, अंत्ययात्रा तसेच सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकीस व कार्यक्रमास लागू राहणार नाहीत. उपरोक्त आदेश मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये संपूर्ण वाशिम जिल्ह्यामध्ये दिनांक २३ डिसेंबर २०२२ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक ०६ जानेवारी २०२३ रोजीचे २४.०० वा. पर्यंत कार्यान्वित राहतील.

प्रस्तुत आदेश लाऊडस्पीकर लावून तसेच ड्रम वाजवून तसेच तहसिल कार्यालय, पोलीस स्टेशन, नगर परिषद कार्यालयाच्या सूचना फलकावर दर्शनी भागावर प्रत लावून लागू करण्यात येईल. पोलीस स्टेशन अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात परिस्थितीनुरुप योग्य कारण असेल व तसे करण्याशिवाय पर्याय नसेल तर अशा परिस्थितीत याबाबत कोणताही आदेश नजिकच्या उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेशी विचार विनिमय करून आदेश लागू करण्यास उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधीकृत करण्यात येत आहे. तसेच, आवश्यकता वाटल्यास उपविभागीय दंडाधिकारी यांनी संवेदनशील ठिकाणी विशेष कार्यकारी अधिकारी/दंडाधिकारी यांच्या नेमणूका कराव्यात.

**वसुमना पंत,** (भा.प्र.से.),

वाशिम : जिल्हादंडाधिकारी,

दिनांक २३ डिसेंबर २०२२. वाशिम.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३२९.

**संदर्भ :-** पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक : जिविशा-का.व.सु.-कलम ३७ (१)(३)-प्रतिबंधक-१८९-२०२३, वाशिम दिनांक १६ जानेवारी २०२३.

**मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७(१) (३) लागू करणे बाबत**

**आदेश**

क्रमांक कक्ष-८-अ.का.(गृह)-कावि-६०-२०२३.—

ज्याअर्थी, वाशिम जिल्ह्यात दिनांक १६ जानेवारी २०२३ रोजी छत्रपती संभाजी राजे यांचा राज्यभिषेक दिन साजरा करण्यात येत असून दिनांक २३ जानेवारी २०२३ रोजी स्व. बाळासाहेब ठाकरे यांची जयंती व नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती, दिनांक २६ जानेवारी २०२३ रोजी प्रजासत्ताक दिन व दिनांक २८ जानेवारी २०२३ रोजी श्री क्षेत्र डव्हा, ता. मालेगाव, जि. वाशिम येथे संत श्री नाथनंगे महाराज यांची यात्रा भरविण्यात येणार आहे.

सद्यःस्थितीत विविध पक्ष/संघटना/सामाजिक कार्यकर्ते यांचेकडून वेगवेगळ्या मागण्याकरीता/धरणे/आंदोलने/उपोषणे करण्यात येत आहेत.

वाशिम जिल्ह्यात सण-उत्सवाचे दृष्टिने व राजकीय दृष्टीने संवेदनशील असून नमूद काळात जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखणे सूलभ व्हावे याकरीता दिनांक १६ जानेवारी २०२३ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक ३० जानेवारी २०२३ रोजीचे २४.०० वा. पर्यंत संपूर्ण वाशिम जिल्ह्यात मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश निर्गमित होणे बाबतचे पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे संदर्भिय विनंती पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

त्याअर्थी, मी, शण्मुगराजन एस. (भा. प्र. से.) जिल्हादंडाधिकारी, वाशिम, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून, मी दिनांक १६ जानेवारी २०२३ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक ३० जानेवारी २०२३ रोजीचे २४.०० वा. पर्यंत मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश पारीत करीत आहे. सदर आदेश लागू केल्यामुळे वाशिम जिल्ह्यामध्ये खालील गोष्टीकरीता मनाई करण्यात येत आहे.

(१) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, लाठ्या किंवा काठ्या तसेच शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येतील अशा इतर कोणत्याही तिक्ष्ण वस्तु जवळ बाळगणे.

(२) कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ वाहून नेण्यास.

(३) दगड किंवा क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा तशी साधने जवळ बाळगणे, जमा करणे, किंवा तयार करणे.

(४) व्यक्तींचे प्रेते किंवा मनुष्याकृतीच्या प्रतिमा/आकृत्या यांचे बिभत्स प्रदर्शन करणे.

(५) वाद्य वाजविणे, किंकाळ्या फोडणे किंवा जाहीरपणे प्रक्षोभक घोषणा करणे अशा प्राधिकारांच्या मते ज्यामुळे नागरी सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्या कृतीमध्ये राज्य प्रशासन उलथुन पाडण्याची प्रवृत्ती दिसून येईल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, सोंग आणने, पत्ते खेळणे आणि तशी चिन्हे, चित्रे, फलके किंवा कोणत्याही जिन्नस/वस्तु तयार करणे किंवा त्याचा लोकामध्ये प्रसार/प्रचार करणे.

तसेच, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींच्या जमावास एकत्र जमण्यास किंवा मिरवणुकीस मनाई करीत आहे.

प्रस्तुत आदेश कामावरील कोणतेही पोलीस अधिकारी किंवा इतर शासकीय / निमशासकीय कर्मचारी किंवा विवाह, अंत्ययात्रा तसेच सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकीस व कार्यक्रमास लागू राहणार नाहीत. उपरोक्त आदेश मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये संपूर्ण वाशिम जिल्ह्यामध्ये दिनांक १६ जानेवारी २०२३ रोजीचे ००.०१ वा. पासून ते दिनांक ३० जानेवारी २०२३ रोजीचे २४.०० वा. पर्यंत कार्यान्वित राहतील.

प्रस्तुत आदेश लाऊडस्पीकर लावून तसेच ड्रम वाजवुन तसेच तहसिल कार्यालय, पोलीस स्टेशन, नगर परिषद कार्यालयाच्या सूचना फलकावर दर्शनी भागावर प्रत लावून लागू करण्यात येईल. पोलीस स्टेशन अधिकारी यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात परिस्थितीनुरुप योग्य कारण असेल व तसे करण्याशिवाय पर्याय नसेल तर अशा परिस्थितीत याबाबत कोणताही आदेश नजिकच्या उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेशी विचार विनिमय करून आदेश लागू करण्यास उपविभागीय दंडाधिकारी यांना प्राधीकृत करण्यात येत आहे. तसेच, आवश्यकता वाटल्यास उपविभागीय दंडाधिकारी यांनी संवेदनशील ठिकाणी विशेष कार्यकारी अधिकारी/दंडाधिकारी यांच्या नेमणूका कराव्यात.

**शण्मुगराजन एस.,**

वाशिम : जिल्हादंडाधिकारी,

दिनांक १६ जानेवारी २०२३. वाशिम.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३०.

## जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हानिवडणूक अधिकारी, यांजकडून

**वाचा :-** पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक : जिविशा-पदवीधर मतदार संघ निवडणूक-२०२३-प्रतिबंधक आदेश-१८७-२०२३, दिनांक १६ जानेवारी २०२३.

### आदेश

क्रमांक कक्ष-८-अ.का.(गृह)-कावि-७६-२०२३.——

ज्याअर्थी, अमरावती पदवीधर मतदार संघ निवडणूक - २०२२-२३ करीता दिनांक २९ डिसेंबर २०२२ रोजी पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली असून, दिनांक ३० जानेवारी २०२३ रोजी मतदान होणार आहे.

अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक २०२२-२३ काळात मतदानाचे दिवशी लोक राजकीय कारणावरुन विनाकारण भांडण तंटे करतात त्याचे रुपांतर मोठ्या भांडणात किंवा घटनेत रुपांतर होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असते. या सर्व बाबींना प्रतिबंध घालण्यासाठी व निवडणूक प्रक्रियेदरम्यान कायदा व सुव्यवस्था आबाधीत राखण्याचे उद्देशाने असून निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोणातून निवडणुकीदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्याकरीता संबधित मतदान केंद्र परिसरात दिनांक २९ जानेवारी २०२३ रोजी सकाळी ०६.०० वा. ते दिनांक ३० जानेवारी २०२३ रोजीचे सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ लागू करणे बाबतचे पोलीस अधिक्षक, वाशिम यांचे संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

ज्याअर्थी, प्राप्त संदर्भिय पत्राचे अवलोकन करून अमरावती विभाग पदवीधर मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक २०२२-२३ चे अनुषंगाने फौजदारी दंड प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम १४४ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी, शण्मुगराजन एस. (भा.प्र.से.) जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, वाशिम, फौजदारी दंड प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम १४४ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, निवडणुकीच्यादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्याकरीता संबंधित मतदान केंद्र परिसरात दिनांक २९ जानेवारी २०२३ रोजीचे सकाळी ०६.०० वा. ते दिनांक ३० जानेवारी २०२३ रोजीचे सायंकाळी ०६.०० वा. पर्यंत फौजदारी दंड प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम १४४ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करीत आहे.

उपरोक्त प्रमाणे आदेश लागू केल्यामुळे खालील बाबींकरीता मनाई करण्यात येत आहे.

१. दिनांक २८-०१-२०२३ रोजीचे दुपारी ४.०० वाजता नंतर राजकिय पक्षांनी प्रचारसभा घेऊ नयेत.

२. धार्मिकस्थळांचा निवडणुकीचे संबंधाने उपयोग करू नये.

३. आचारसंहितेच्या संपूर्ण काळात सार्वजनिक ठिकाणी शस्त्र जवळ बाळगता येणार नाही.

४. मतदानाचे दिवशी मतदान केंद्राचे ठिकाणी १०० मिटर परिसरात निवडणुकीचे कामाव्यतिरिक्त कोणताही व्यक्ती प्रवेश करणार नाही.

५. मतमोजणीचे ठिकाणचे १०० मिटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू राहतील.

सदर आदेश आज दिनांक १९-०१-२०२३ रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

**शण्मुगराजन एस.,**

वाशिम : जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा

दिनांक १६ जानेवारी २०२३. निवडणूक अधिकारी, वाशिम.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३१.

## अपर जिल्हादंडाधिकारी, यांजकडून

**संदर्भ :** (१) पोलीस अधीक्षक, (ग्रामिण) अमरावती यांचे पत्र क्र. जिविशा-४६६८-२०२३, दिनांक २ जानेवारी २०२३.

### आदेश

क्रमांक कलि-एमएजी-डे-२७-कावि-१६-२०२३.—

उपरोक्त संदर्भान्वये सध्याच्या राजकीय घडामोडीच्या पार्श्वभूमीवर काही समाजकंटक क्षुल्लक कारणावरुन वाद निर्माण करून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करू शकतात. तसेच, विविध राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी हे एकमेकांविरोधात बयानबाजी व पोस्टरबाजी करीत असल्यामुळे स्थानिक स्तरावर त्यांचे कार्यकर्ते समोरासमोर येऊन वाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दिनांक २० डिसेंबर २०२२ रोजी पासून श्री क्षेत्र बहीरम बाबा यात्रा सुरू आहे. सोबतच आठवड्याचे प्रत्येक शनिवार व रविवार रोजी श्री क्षेत्र भिलटेक येथे यात्रा भरविल्या जाते. दोन्ही यात्रेमध्ये भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विविध वस्तूच्या दरवाढीमुळे स्थानिक संघटना तसेच विविध मागण्या व प्रश्नांवर मुस्लीम संघटना, हिंदू संघटना, शेतकरी संघटना व इतर संघटना, पक्ष अचानक आंदोलने करू शकतात. त्याचप्रमाणे मराठा / धनगर / ओबीसी समाजातर्फे आरक्षण करीता आंदोलन करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर काळात काही खोडसाळ समाजकंटकांकडून क्षुल्लक कारणावरून वाद निर्माण करून तसेच स्थानिक नागरिकांकडून व राजकीय पक्ष संघटनांकडून वेळोवेळी किंवा अचानकपणे आपआपल्या मागण्याकरीता आंदोलने करण्यात येतात. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी वरिल बाबी लक्षात घेता जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधीत राहावी, याकरीता पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) प्रमाणे प्रतिबंधक आदेश दिनांक ०३ जानेवारी २०२३ चे ००.०१ वा. पासून ते दिनांक १७ जानेवारी २०२३ चे २४.०० वा. पर्यंत लागू करण्यात येत आहे.

उपरोक्त बाबी लक्षात घेता जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधीत राहावी या दृष्टीने सुरक्षिततेसाठी उपाय योजना करण्याचे दृष्टीने मी, विवेक घोडके, अपर जिल्हादंडाधिकारी मला प्रदान असलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र पोलीस अधिसूचना व आदेशान्वये खालील प्रकारास बंदी घालीत आहे.

**अधिसूचना मुं. पो. कायदा, १९५१ कलम ३७ (१)**

१. शस्त्रे, तसेच तलवार, भाला, चाकू, लाठी व इतर वस्तुमुळे जीवीत हानी होऊ शकते असे शस्त्र.

२. विस्फोटकाचे व कच्च्या मालाची वाहतूक करणे.

३. दगड, विटा इत्यादी क्षेपणास्त्राचा वापर करणे (गोळा करणे).

४. माणसाच्या/जमावाच्या एकत्रिकरण करण्यास, पुतळ्याचे प्रदर्शन करण्यास.

५. जाहीररित्या ओरडणे, गाणे संगीत वाजविणे, बिभित्स चाळे करणे, अंगविक्षेप करणे, चित्र-विचित्र कृती करणे, छायाचित्राचे प्रदर्शन करणे.

**अधिसूचना म. पो. का., १९५१ कलम ३७ (३)**

कोणत्याही मानवी मेळाव्यास, मिरवणुकीस कोणत्याही ठिकाणी आयोजित करण्यास सार्वजनिक सुरक्षिततेसाठी, धोका होण्याची शक्यता लक्षात घेऊन बंदी घालीत आहे.

महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम (१) अन्वये जारी केलेल्या म. पो. का. च्या कलम ३७ (२) अन्वये जारी केलेला आदेश दिनांक दिनांक ०३ जानेवारी २०२३ चे ००.०१ वा. पासून ते दिनांक १७ जानेवारी २०२३ चे २४.०० वा. पर्यंत अमरावती जिल्ह्यात पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून ग्रामिण भागात लागू राहील.

उपरोक्त कलम ३७ (१) अन्वये जारी केलेल्या अधिसूचनाचे उल्लघंनाबाबत महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) अन्वये कारवाई करण्यात येईल. तसेच, कलम ३७ (१) अन्वये जारी केलेल्या आदेशाचे उल्लघंनाबाबत संबंधितांवर उचित कायदेशिर कारवाई करीता महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ च्या कलम (३) अन्वये करण्यात येईल. उपरोक्त आदेश कामावरील शासकीय, निमशासकीय कर्मचारी, लग्न, नाटक, तमाशे, धार्मिक शासकीय कार्यक्रम, आठवडी बाजार यांना लागू होणार नाही. अंत्ययात्रेच्या व्यतिरीक्त कोणत्याही मिरवणुका / कोणत्याही रस्ता / ओळी मधून कोणत्याही पोलीस स्टेशन अधिका-यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक ०३ जानेवारी २०२३ रोजी जारी केले.

**मनिष गायकवाड,**
अपर जिल्हादंडाधिकारी
अमरावती.

अमरावती :
दिनांक ३ जानेवारी २०२३.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३२.

**संदर्भ :** (१) पोलीस अधीक्षक, (ग्रामिण) अमरावती यांचे पत्र क्र. जिविशा-१७९-२०२३, दिनांक १६ जानेवारी २०२३.

**आदेश**

क्रमांक कलि-एमएजी-डे-२७-कावि-५९-२०२३.—

उपरोक्त संदर्भान्वये सध्याच्या राजकीय घडामोडीच्या पार्श्वभूमीवर काही समाजकंटक क्षुल्लक कारणावरून वाद निर्माण करून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करून शकतात. तसेच, विविध राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी हे एकमेकांविरोधात बयानबाजी व पोस्टरबाजी करीत असल्यामुळे स्थानिक स्तरावर त्यांचे कार्यकर्ते समोरासमोर येऊन वाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दिनांक २० डिसेंबर २०२२ रोजी पासून श्री क्षेत्र बहीरम बाबा यात्रा सुरू आहे. सोबतच आठवड्याचे प्रत्येक शनिवार व रविवार रोजी श्री क्षेत्र भिलटेक येथे यात्रा भरविल्या जाते. दोन्ही यात्रेमध्ये भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तसेच, दिनांक २६ जानेवारी २०२३ प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून नागरिक, संघटना, पक्ष व इतर हे आत्मदहन, धरणे, मोर्चे इत्यादी करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

विविध वस्तूच्या दरवाढीमुळे स्थानिक संघटना तसेच विविध मागण्या व प्रश्नांवर मुस्लीम संघटना, हिंदू संघटना, शेतकरी संघटना व इतर संघटना, पक्ष अचानक आंदोलने करू शकतात. त्याच प्रमाणे मराठा / धनगर/ ओबीसी समाजातर्फे आरक्षण करीता आंदोलन करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर काळात काही खोडसाळ समाजकंटकांकडून क्षुल्लक कारणावरुन वाद निर्माण करून तसेच स्थानिक नागरिकांकडून व राजकीय पक्ष संघटनांकडून वेळोवेळी किंवा अचानकपणे आपआपल्या मागण्याकरीता आंदोलने करण्यात येतात. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकरता येत नाही.

तरी वरिल बाबी लक्षात घेता जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधीत राहावी याकरीता पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) प्रमाणे प्रतिबंधक आदेश दि. १८ जानेवारी २०२३ चे ००.०१ वा. पासून ते दि. ०१ फेब्रुवारी २०२३ चे २४.०० वा. पर्यंत लागू करण्यात येत आहे.

उपरोक्त बाबी लक्षात घेता जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधीत रहावी या दृष्टीने सुरक्षिततेसाठी उपाय योजना करण्याचे दृष्टीने मी, विवेक घोडके, अपर जिल्हादंडाधिकारी मला प्रदान असलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र पोलीस अधिसूचना व आदेशान्वये खालील प्रकारास बंदी घालीत आहे.

**अधिसूचना मुं. पो. कायदा, १९५१ कलम ३७ (१)**

१. शस्त्रे, तसेच तलवार, भाला, चाकू, लाठी व इतर वस्तुमुळे जीवीत हानी होऊ शकते असे शस्त्र.

२. विस्फोटकाचे व कच्च्या मालाची वाहतूक करणे.

३. दगड, विटा इत्यादी क्षेपणास्त्राचा वापर करणे (गोळा करणे).

४. माणसाच्या/जमावाच्या एकत्रिकरण करण्यास, पुतळ्याचे प्रदर्शन करण्यास.

५. जाहीररित्या ओरडणे, गाणे संगीत वाजविणे, बिभित्स चाळे करणे, अंगविक्षेप करणे, चित्र-विचित्र कृती करणे, बदनामीकारक बोलणे, छायाचित्राचे प्रदर्शन करणे.

**अधिसूचना म. पो. का., १९५१ कलम ३७ (३)**

कोणत्याही मानवी मेळाव्यास, मिरवणुकीस कोणत्याही ठिकाणी आयोजित करण्यास सार्वजनिक सुरक्षिततेसाठी, धोका होण्याची शक्यता लक्षात घेऊन बंदी घालीत आहे.

मुंबई पोलीस कायदा, १९५१ चे कलम (१) अन्वये जारी केलेल्या मुंबई पोलीस कायद्याच्या कलम ३७ (२) अन्वये जारी केलेला आदेश दिनांक दिनांक १८ जानेवारी २०२३ चे ००.०१ वा. पासून ते दि. ०१ फेब्रुवारी २०२३ चे २४.०० वा. पर्यंत अमरावती जिल्ह्यात पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून ग्रामिण भागात लागू राहील.

उपरोक्त कलम ३७ (१) अन्वये जारी केलेल्या अधिसूचनाचे उल्लंघनाबाबत महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) अन्वये कारवाई करण्यात येईल. तसेच, कलम ३७ (१) अन्वये जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघनाबाबत संबंधितांवर उचित कायदेशिर कारवाई करीता महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ च्या कलम (३) अन्वये करण्यात येईल. उपरोक्त आदेश कामावरील शासकीय, निमशासकीय कर्मचारी, लग्न, नाटक, तमाशे, धार्मिक शासकीय कार्यक्रम, आठवडी बाजार यांना लागू होणार नाही. अंत्ययात्रेच्या व्यतिरीक्त कोणत्याही मिरवणुका / कोणत्याही रस्ता / ओळी मधून कोणत्याही पोलीस स्टेशन अधिका-यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक १८ जानेवारी २०२३ रोजी जारी केले.

**विवेक घोडके,**
अपर जिल्हादंडाधिकारी
अमरावती.

अमरावती :
दिनांक १६ जानेवारी २०२३.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.